दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❁ सोमवार, दि. ०८ जून २०२६ ❁ वर्ष : १ ❁ अंक : ४९ ❁ पाने : ४ ❁ किंमत : ४ रू. ❁ Email : hinduprakashvarta@gmail.com

## कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन, मोदी सरकार बॅकफूटवर

देशातील शिक्षण व्यवस्थेला लागलेली पेपर लीकची कीड आणि त्यामुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर शनिवारी एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक आंदोलन संपन्न झाले. 'कॉकरोच जनता पार्टी' या नवीन संघटनेच्या वतीने आयोजित या आंदोलनात हजारो संतप्त युवक आणि युवतींनी सहभाग नोंदवला होता.

---> अग्रलेख - पान 2 वर

## कोल्ह्याची दहशत! चिमुकल्यासह 11 जण जखमी; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटना सातत्याने समोर येत असताना आता कागल तालुक्यात एका कोल्ह्याने नागरिकांची झोप उडवली आहे. बिबट्या, गवा आणि टस्करनंतर आता कोल्ह्याच्या हल्ल्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कोल्ह्याने आतापर्यंत ११ जणांना जखमी केल्याची माहिती समोर आली आहे. कागल तालुक्यातील बोरवडे-मालवे परिसरातील मगदूम वसाहतीत गुरुवारी सायंकाळी ही घटना घडली.

# विरोधक एकवटणार, 23 पक्ष दिल्लीत एकत्र जमणार... इंडिया आघाडी किती मजबूत?



**दिल्ली :** राजधानी दिल्लीतून मोठी बातमी समोर आली आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर प्रथमच सोमवारी इंडिया आघाडीतील घटक पक्षांची बैठक होणार आहे. कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये होणाऱ्या या बैठकीत 23 राजकीय पक्ष सहभागी होणार आहेत. यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह इतर विरोधी पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**पराभवानंतर प्रथमच ममता बॅनर्जी दिल्ली दौऱ्यावर :**
पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी हे प्रथमच दिल्ली दौऱ्यावर असणार आहेत. हो दोघेही विरोधकांच्या बैठकीला हजेरी लावणार आहेत. मात्र, तामिळनाडू निवडणुकीतील पराभव आणि टीव्हीके सरकारला काँग्रेसने दिलेल्या पाठिंब्यानंतर डीएमकेने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. डीएमकेच्या नेत्यांनी या बैठकीत सहभागी होण्यास नकार दिला आहे. तसेच आम आदमी पार्टीही बैठकीत सहभागी होण्याची शक्यता कमी आहे. आता उद्याच्या बैठकीत सीपीएम आणि काँग्रेसमधील मतभेद उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**काँग्रेसच्या आरोपांमुळे माकप नाराज :**
केरळ विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान करण्यात आलेल्या वक्तव्यांवरून काँग्रेस आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्यातील वादावर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. सीपीएमचे महासचिव एम ए बेबी यांनी खरगे यांना पत्र लिहून काँग्रेस नेत्यांकडून वारंवार करण्यात येणाऱ्या आरोपांबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. केरळमध्ये सीपीएमने भाजपाशी संगनमत केल्याचा आरोप काँग्रेसकडून केला जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

एम ए बेबी यांनी आपल्या पत्रात, 'अशा प्रकारचे आरोप इंडिया आघाडीच्या भावनेला धरून नाहीत. तसेच केरळचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्याविरोधात चौकशीची मागणी करून काँग्रेस नेते विरोधी एकजूट कमकुवत करत आहेत का? असा सवालही उपस्थित केला आहे. मतभेद असूनही सीपीएमने बैठकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला असून पक्षाचे प्रतिनिधित्व राज्यसभा खासदार जॉन ब्रिटास करणार आहेत.

माकप नेते हनान मोल्ला यांनी काँग्रेसवर टीका करताना म्हटले की, 'आघाडीतील सर्व पक्षांना सोबत घेऊन जाण्यात काँग्रेस अपयशी ठरत आहे. सर्वात मोठ्या पक्षाची जबाबदारी आघाडी टिकवून ठेवण्याची असते, पण काँग्रेस नेते आवश्यक परिपक्वता दाखवत नाहीत.' मोल्ला यांनी डीएमके आणि सीपीएमवर टीका केल्याबद्दल राहुल गांधी यांच्यावरही निशाणा साधला आहे.

### बैठकीचा अजेंडा काय आहे?

**विरोधकांच्या या बैठकीचा अधिकृत अजेंडा अद्याप समोर आलेला नाही. मात्र, काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी सांगितले की, काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर विरोधी पक्ष एकत्र आहेत. काही पक्ष बैठकीत सहभागी होणार नसल्याचे मान्य करत त्यांनी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारविरोधातील लढा सुरूच राहील, असे स्पष्ट केले आहे.**

## लाडक्या बहिणींच्या मे-जूनचा हप्ता एकत्र खात्यात येण्याची शक्यता



**मुंबई :** जून महिन्याचा आठवडा गेला, पण अद्याप मे महिन्याचा हप्ता जमा झालेला नाही. त्यामुळे मे आणि जून या दोन महिन्यांचे हप्ते कधी येणार? अशी चर्चा राज्यातील महिलांमध्ये सुरू आहे. ईकेवायसीनंतर ८० लाखांपेक्षा जास्त महिला अपात्र ठरल्या आहेत. पण पात्र महिलांच्या नजरा मे आणि जून या हप्त्याकडे लागल्या आहेत. राज्यातील पात्र महिलांच्या खात्यावर एकत्र ३००० जमा होणार का? असा प्रश्न अनेकांच्या मनात घोंघावत आहे.

दरम्यान, राज्यात सध्या विधान परिषदेच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. त्यामुळे आचारसंहिता सुरू असताना खात्यात पैसे येणार की नाही? असा प्रश्न विचारला जात आहेत. अशातच आता लाडक्या बहिणींना मे आणि जून या दोन महिन्यांचे हप्ता एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

जून महिना सुरू होऊन आता आठवडा झाला आहे, पण अद्याप हप्त्याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता या महिन्यात दोन महिन्याचे म्हणजे मे आणि जूनचे हप्ते एकत्र येणार का? असा प्रश्न महिलांच्या मनात निर्माण झाला आहे. लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला हप्ता दिला जातो. पण आचारसंहिता असल्यामुळे हप्ता लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

१८ जून रोजी विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्याळे त्याआधी लाडक्या बहिणींच्या खात्यावर हप्ता जमा होण्याची शक्यता कमीच आहे. निवडणुकीनंतरच महिलांच्या खात्यात हप्ता जमा होऊ शकतो. जर या निवडणूकांनंतर पैसे येणार असतील तर मे आणि जून महिन्याचा हप्ता एकत्र येऊ शकतो. मात्र, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार जून महिन्याच्या अखेरीस दोन महिन्यांचे एकत्र पैसे खात्यावर येऊ शकतात.

## पीएम किसानचा 23वा हप्ता लवकरच खात्यात, पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार वितरण

**मुंबई :** शेतकऱ्यांसाठी भारतात अनेक योजना राबवल्या जातात. त्यामध्ये शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. सध्या पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा लाभ शेतकरी घेत आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांना वर्षभरात ६००० रुपये दिले जातात. आता योजनेची मोठी अपडेट समोर आली आहे. शेतकऱ्यांना पीएम किसान योजने अंतर्गत एका वर्षात ६००० रुपयांचा हप्ता दिला जातो. म्हणजेच ४ महिन्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रुपये जमा होतात. हे तीन हप्ते एप्रिल पासून ते जुलै या महिन्यादरम्यान येतात. तर पुढचा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर आणि शेवटचा डिसेंबर ते मार्च अशा पद्धतीत दिला जातो. आत्तापर्यंत २२ हप्ते शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर पाठवण्यात आले आहेत. तर २२ वा हा मार्चमध्ये जमा केला होता. म्हणजेच पुढचा हप्ता २३वा हप्ता जून महिन्यात खात्यात जमा होईल. असा अंदाज आहे.

# अयोध्येतील राममंदिराच्या तिजोरीवर डल्ला

## कोट्यवधींची रक्कम गायब; अखिलेश यादवांच्या दाव्याने खळबळ



**नवी दिल्ली :** अयोध्येतील भव्य राममंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी मंदिराच्या देणगी रकमेवरून वाद निर्माण झाला आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी कोट्यवधी रुपयांची देणगी रक्कम गायब झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वातावरण तापले असून विविध चर्चांना उधाण आले आहे.

अखिलेश यादव यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत यासंदर्भात दावा केला आहे. राममंदिरात जमा झालेल्या देणगीतील कोट्यवधी रुपयांची रक्कम गायब झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच याप्रकरणी न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या मुद्द्यावर सरकार आणि संबंधित ट्रस्टकडून स्पष्ट भूमिका समोर येत नसल्याने संशय निर्माण होत असल्याचेही त्यांनी या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

समाजवादी पक्षानेही या प्रकरणात पारदर्शकतेची मागणी केली आहे. मंदिरासाठी आतापर्यंत किती निधी जमा झाला, तो कोणत्या कामांसाठी खर्च करण्यात आला आणि शिल्लक रकमेचा तपशील काय आहे, याची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी पक्षाकडून करण्यात आळी आहे. भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा हिशेब जनतेसमोर मांडणे आवश्यक असल्याचेही त्यांनी म्हटलं.

दरम्यान, या आरोपांवर प्रतिक्रिया देताना श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त महंत दिनेंद्र दास यांनी सांगितलं की, प्रभू रामांच्या न्यायावर आमचा पूर्ण विश्वास आहे. संस्थेत कोणताही गैरप्रकार झाला नाही. जर झाला असेल तर सत्य समोर येईल आणि दोषींना योग्य शिक्षा मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राममंदिराच्या देणगी व्यवस्थापनाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## राष्ट्रवादीचं धक्कातंत्र, भुजबळ, राणांचा पत्ताकट, या नेत्याला राज्यसभेची उमेदवारी जाहीर

**मुंबई :** राष्ट्रवादीकडून राज्यसभेसाठी छगन भुजबळ नव्हे तर राजेंद्र जैन यांनी उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला होता. या रिक्त झालेल्या जागेवर कुणाला संधी द्यायची याबाबत राष्ट्रवादीत चर्चा होती. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे राज्यसभेसाठी उत्सुक होते, मात्र आता राष्ट्रवादीकडून राजेंद्र जैन यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही घोषणा केली आहे.

**राजेंद्र जैन महायुतीचे उमेदवार – तटकरे :**
राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करताना सुनील तटकरे यांनी म्हटले की, राजेंद्र जैन हे राष्ट्रवादीचे आणि महायुतीचे उमेदवार असतील. भंडारा गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून त्यांनी 12 वर्षे प्रतिनिधित्व केलेले आहे. मध्यवर्ती बँक, फेडरेशन या सर्व संस्थांच्या मध्ये दीर्घकाळ राजेंद्र जैन यांनी काम केलं आहे. विदर्भातून संधी देण्याचं बरेच दिवस मनात होतं, त्यामुळे एकमताने त्यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे.

**छगन भुजबळही होते आग्रही :** छगन भुजबळही राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छूक होते. याबाबत प्रश्न विचारला असता तटकरे यांनी सांगितले की, 'याबाबत आम्ही पक्षांतर्गत चर्चा केली. भुजबळ साहेब 1999 सालपासून सोबत आहेत. दादांनी निर्णय घेतल्यानंतर त्यांचेही निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचं योगदान आहे. त्यांच्या ज्येष्ठत्वाचा सन्मान होणार आहे. आगामी काळात त्यांचा सन्मान करण्यात येईल.' यावेळी छगन भुजबळही उपस्थित होते, मात्र ते एक शब्दही न बोलता निघून गेले.

**भुजबळांनी घातली होती अट :** समोर आलेल्या माहितीनुसार, छगन भुजबळ यांना राज्यसभेवर पाठवण्यासाठी पक्षातील वरिष्ठ नेते आग्रही होते.

## 'ऑल आऊट ऑपरेशन'मध्ये ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई; 72 आरोपींविरुद्ध 53 गुन्हे दाखल

### अवैध धंद्यांवर धडक कारवाई; 1 कोटी 17 लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि असामाजिक घटकांवर आळा घालण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी राबविलेल्या 'ऑल आऊट ऑपरेशन'मध्ये मोठी कारवाई करण्यात आली. या विशेष मोहिमेत ७२ आरोपींविरुद्ध ५३ गुन्हे दाखल करण्यात आले असून तब्बल १ कोटी १७ लाख ८४ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जून रोजी सायंकाळी ६ ते ७ जून रोजी सकाळी ६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि स्थानिक पथकांनी सहभाग घेतला.

कारवाईदरम्यान अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांविरोधात एक गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात ८ आरोपींना अटक करून ११ वाहने जप्त करण्यात आली असून सुमारे १ कोटी ११ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अवैध हातभट्टी दारूविरोधातील मोहिमेत २० आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिसांनी ५ हजार ६१८ लिटर हातभट्टी दारूचे रसायन, ४१९ लिटर तयार दारू तसेच दारू निर्मितीचे साहित्य नष्ट करून सुमारे ४ लाख ३३ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याशिवाय देशी-विदेशी मद्याची अवैध विक्री करणाऱ्या १८ आरोपींविरोधात कारवाई करून ९२५ मद्याच्या बाटल्या, वाहने व अन्य साहित्य असा १ लाख ५६ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार अड्ड्यांवर छापे टाकून २१ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून १७ हजार ५६० रुपयांची रोकड आणि जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

तसेच शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा वाहतुकीवर कारवाई करत पोलिसांनी ७० हजार ६०० रुपयांचा गुटखा जप्त केला. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात मोटार वाहन कायद्यान्वये तीन गुन्हे नोंदविण्यात आले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे, गुन्हेगारी कृत्ये आणि असामाजिक प्रवृत्तींविरोधातील अशा कारवाया पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील, असा इशारा दिला आहे. या मोहिमेचे नियोजन अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.

## राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अभिनेत्याचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन, मनोरंजन विश्वावर शोककळा

### वयाच्या 56 व्या वर्षी अभिनेत्याने घेतला अखेरचा श्वास



**मुंबई :** मनोरंजन विश्वातून दुःखद बातमी समोर आली आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते मल्याळम अभिनेते आणि दिग्दर्शक सलीम कुमार (Salim Kumar) यांचे ६ जूनला निधन झाले. ६ जूनला रात्री कोची येथील एका खाजगी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. वयाच्या ५६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे मल्याळम चित्रपटसृष्टी आणि जगभरातील त्यांच्या चाहत्यांवर शोककळा पसरली आहे. तसेच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

'न्यू इंडियन एक्सप्रेस'च्या वृत्तानुसार, सलीम कुमार यांना यकृताचा सिरोसिस (liver cirrhosis) हा आजार होते. काही वर्षांपूर्वी यकृताचा सिरोसिस असल्याचे निदान झाल्यानंतर त्यांच्यावर यकृत प्रत्यारोपणाची (Liver transplant) शस्त्रक्रियाही करण्यात आली होती. प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना डॉक्टरांनी त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवले होते. मात्र, शनिवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे निधन झाले.

मल्याळम चित्रपटसृष्टीतील कलाकार, मनोरंजन विश्वातील कलाकार आणि चाहत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनेत्यावर श्रद्धांजली वाहिली आहे. १९६९ मध्ये पारवूर येथे जन्मलेल्या सलीम कुमार यांनी आपल्या कलाप्रवासाची सुरुवात 'मिमिक्री' कलाकार म्हणून केली. १९८० आणि १९९० च्या दशकात केरळमध्ये बहरलेल्या मिमिक्रीच्या मंचावरून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला.

# मराठी चित्रपटासारखी 'विहीर चोरीला' गेल्याची धक्कादायक घटना; कागदावर तीन विहिरी, प्रत्यक्षात मात्र दोनच!

## अंधारी गावातील सातबारा फेरफार घोटाळा चव्हाट्यावर; तलाठी आणि मंडल अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर संशय

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** एका प्रसिद्ध मराठी चित्रपटात विहीर चोरीला गेल्याचे दाखवून प्रशासकीय भ्रष्टाचारावर उपरोधिक भाष्य करण्यात आले होते. अगदी तसाच प्रकार आजच्या कलयुगात प्रत्यक्षात घडल्याची धक्कादायक घटना अंधारी गावामध्ये समोर आली आहे. सरकारी कागदपत्रांवर आणि सातबाऱ्यावर तब्बल तीन विहिरींची नोंद करण्यात आली आहे, परंतु प्रत्यक्षात जमिनीवर पाहणी केली असता केवळ दोनच विहिरी अस्तित्वात असून तिसरी विहीर गायब असल्याचे उघड झाले आहे. या अजब प्रकारामुळे शेतकरी चक्रावून गेले असून, महसूल विभागाच्या डोळेझाक आणि संगनमतामुळे हा लाखो रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप पीडित शेतकऱ्यांनी केला आहे.

अंधारी गावातील गट क्रमांक तीनशे सव्वीस मधील जमिनीचा हा संपूर्ण वाद आहे. जुन्या नोंदीनुसार आणि दोन हजार पंचवीस च्या सातबाऱ्याप्रमाणे या संपूर्ण गटामध्ये केवळ दोनच विहिरींची अधिकृत नोंद होती. यातील पहिली स्वतंत्र विहीर मलिकाबी सरताज बेग यांच्या नावावर असून ती दोन हजार अकरा मध्ये खोदण्यात आली होती. तर दुसरी विहीर चांद बेग यासीन बेग यांच्या नावावर दोन हजार पंधरा मध्ये नोंदवली गेली होती. ही वस्तुस्थिती असताना, दोन हजार चोवीस आणि दोन हजार सव्वीस च्या दरम्यान महसूल अधिकाऱ्यांच्या मदतीने सातबाऱ्यावर अचानक तिसऱ्या नवीन विहिरीची नोंद करण्यात आली. रईस शाह बेग चांद बेग यांच्या नावाने ही तिसरी विहीर दाखवण्यात आली असून, फेरफार क्रमांक सात हजार नऊशे तेरा नुसार ही नोंद करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रत्यक्षात या जागेवर कोणतीही नवीन विहीर खोदण्यात आलेली नाही. ज्या विहिरीला 'नवीन विहीर' म्हणून दाखवून तलाठी मॅडम आणि मंडल अधिकाऱ्यांनी स्पॉट व्हेरिफिकेशन (स्थळ पाहणी) केले, ती विहीर प्रत्यक्षात बारा वर्षे जुनी आहे. या विहिरीच्या आतून आलेली झाडे, तिथला जुना डब्बर, जुनी माती आणि दगड पाहिल्यास ती अत्यंत जुनी असल्याचे स्पष्ट होते. असे असतानाही, केवळ काही व्यक्तींना आर्थिक फायदा पोहचवण्यासाठी आणि त्यांच्या नावावर विहीर चढवून आसपासची जमीन हडप करण्याचा हा डाव असल्याचा संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. जेव्हा पीडित शेतकरी या संदर्भात तलाठी कालिंदी माधवराव पाटील यांच्याकडे विचारणा करण्यासाठी गेले, तेव्हा त्यांनी कोणतीही ठोस उत्तरे न देता केवळ अर्ज देण्यास सांगून वेळ मारून नेली. मंडल अधिकारी देखील या विषयावर उडवाउडवीची उत्तरे देत असल्यामुळे शेतकऱ्यांचा संशय अधिक बळावला आहे.

हा सर्व प्रकार म्हणजे प्रशासनाच्या डोळ्यात धूळ झोकून केलेला शुद्ध भ्रष्टाचार आहे. पूर्वी ऑनलाईन कारभारामुळे पारदर्शकता येईल असे म्हटले जात होते, परंतु सध्या ऑनलाईन प्रणालीचा गैरवापर करून हस्तलिखितापेक्षाही जास्त वेगाने फेरफार आणि बोगस नोंदी केल्या जात आहेत, असा जाहीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या प्रकरणाच्या विरोधात उपविभागीय अधिकारी (एसडीएम) कार्यालयात आधीच अपील दाखल करण्यात आले असून न्यायालयात खटला सुरू आहे. कोर्टात केस प्रलंबित असतानाही मंडल अधिकाऱ्यांनी घाईघाईने निर्णय घेऊन शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या बोगस विहिरीची नोंद सातबाऱ्यावरून तातडीने कमी केली नाही किंवा ती विहीर कुठे आहे हे दाखवले नाही, तर त्यांना तीव्र पाऊल उचलावे लागेल. आपल्या हक्कासाठी आणि भविष्यातील मुलांच्या न्यायासाठी वय वर्ष्या बहात्तर असलेले वृद्ध शेतकरी देखील या लढ्यात रस्त्यावर उतरले आहेत. प्रशासनाने दखल न घेतल्यास आमरण उपोषण किंवा आत्मदहन करण्याचा इशारा कुटुंबियांनी दिला असून, या सर्व प्रकाराला महाराष्ट्र शासन जबाबदार राहील असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# संपादकीय

## ओबीसींच्या संतापाकडे दुर्लक्ष करणे सरकारला महागात पडणार!

राज्यामध्ये सध्या मराठा आणि इतर मागासवर्गीय म्हणजेच ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सामाजिक आणि राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. राज्य सरकारने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला आहे. या नवीन निर्णयानुसार, राज्यात आतापर्यंत ज्या काही सवलती आणि सोयी-सुविधा ओबीसी समाजाला लागू होत्या, त्या सर्वच्या सर्व सुविधा आता मराठा समाजालाही लागू करण्यात येणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे आधीच धुमसत असलेल्या आरक्षणाच्या वादात आणखी तेल ओतले गेले आहे. दुसरीकडे, मराठा समाजाला थेट ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे हे सातत्याने आंदोलन करत आहेत. या सर्व घडामोडींमुळे जर मराठा समाज ओबीसी प्रवर्गात समाविष्ट झाला, तर मूळ ओबीसी बांधवांवर प्रचंड मोठा अन्याय होईल, अशी तीव्र आणि भीतीची भावना ओबीसी समाजामध्ये निर्माण झाली आहे. हीच बाजू ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी वेळोवेळी मांडली असून, आता त्यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच जाहीर आव्हान दिल्यामुळे हा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. सांगली येथे आयोजित एका जाहीर सभेत बोलताना लक्ष्मण हाके यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. तुमचा डीएनए जर खरोखरच ओबीसीचा असेल तर ओबीसींचे आरक्षण वाचवून दाखवा, अन्यथा आगामी निवडणुकीत तुम्हाला घरी बसवल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशारा त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिला आहे. बेरोजगार तरुणांना 'झुरळ' म्हटल्यानंतर देशातील तरुण ज्याप्रमाणे एका नवीन पक्षाच्या रूपाने एकत्र आले आहेत, तोच दाखला देत हाके यांनी सरकारला धोक्याची घंटा दिली आहे. ओबीसी समाजाची लोकसंख्या तब्बल साठ टक्के असून, जर हा संपूर्ण समाज आपल्या हक्कासाठी राजकीयदृष्ट्या एकवटला, तर राज्यातील प्रस्थापित सत्ताधारी, मोठे कारखानदार आणि भांडवलदारांना आपली सत्ता गमवावी लागेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. ओबीसींना मिळणाऱ्या सवलती मराठा समाजाला देण्याचा सरकारचा निर्णय हा मूळ ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणारा आहे आणि हे आम्हाला कधीही मान्य होणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. ज्या दिवशी हा साठ टक्के समाज आपली स्वतंत्र राजकीय भूमिका घेईल, त्या दिवशी प्रस्थापित वतनदारांना पळता भुई थोडी होईल, असे सांगत त्यांनी थेट व्यवस्थेलाच आव्हान दिले आहे. या संपूर्ण वादात मराठा आणि ओबीसी नेत्यांमधील शाब्दिक युद्धही टोकाला पोहोचले आहे. मनोज जरांगे यांनी ओबीसी नेत्यांवर कठोर शब्दांत टीका करताना, हे नेते केवळ स्वतःचा फायदा करून घेणारे आहेत, असा टोला लगावला होता. या आरोप-प्रत्यारोपांमुळे गावांमधील सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची चिन्हे आहेत. सरकारने केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून किंवा तात्पुरती मलमपट्टी म्हणून घेतलेले निर्णय समाजासमाजांमध्ये तेढ निर्माण करत आहेत. कोणत्याही एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या घटकावर अन्याय होणार नाही, याची काळजी राज्यकर्त्यांनी घेणे गरजेचे असते. परंतु, सध्याच्या परिस्थितीत मूळ ओबीसींच्या हिताकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना वाढीस लागली आहे. हा असंतोष केवळ भाषणांपुरता मर्यादित न राहता मतपेटीतून बाहेर पडला, तर सध्याच्या सत्ताधाऱ्यांना त्याचे मोठे राजकीय परिणाम भोगावे लागतील, हे निश्चित. त्यामुळे सरकारने या इशाऱ्याकडे गांभीर्याने पाहून सर्वसमावेशक मार्ग काढणे हेच राज्याच्या हिताचे ठरेल.

# भारत स्वतंत्र विचार करतो डोनाल्ड ट्रम्पचा नाही.!

मागील चार सहा महिन्या पासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारताच्या विरोधात वक्तव्य करताहेत असं वरकरणी दिसतं आहे. अर्थात ह्याचा अर्थ आणि त्याची वस्तुस्थिती ही आंतरराष्ट्रीय अभ्यासक अधिक चांगली समजू शकतात. पण आपल्या सारख्या सामान्य ग्रामीण मानवी लोकांना सध्याची ट्रम्प ह्यांची वक्तव्य हे भारताच्या बाजूचे वाटत नाही. मला जेंव्हा पासून अक्कल यायला सुरुवात झाली तेंव्हापासून मला माहिती आहे की अमेरिका आपलं मैत्री राष्ट्र नाही. अमेरिकेने आपल्याला कधीही अडचणीत मदत केली नाही, अडचणीत मात्र वेळोवेळी आणलं आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांची वयक्तिक मैत्री मात्र सर्वश्रुत आहे. पण जेव्हा राष्ट्र हा विषय येतो तेंव्हा वयक्तिक मैत्रीला फारस महत्व राहत नाही. आणि मोदी देखील त्याचा विचार करत नाहीत. ट्रम्प ह्यांची मागील काही महिन्यातील वक्तव्य ही लहरीपणाची दिसतात. लहिरी राजा कुणालाही आणि कधीच परवडणारा नसतो. ह्या संदर्भात मी मागील दोन दिवसात माझ्या अमेरिकेत राहणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय माहिती असणाऱ्या मित्रांना जेंव्हा बोललो तेंव्हा त्यांना ह्या विषयात काही शंका आल्या, ज्या की बऱ्याच अंशी तथ्य वाटतात, आणि मलाही वाटत भारत आता आत्मनिर्भर बनतोय, भारत ऊर्जा क्षेत्राच्या आणि व्यापार क्षेत्राच्या बाबतीत स्वतंत्र्य विचार करतोय, डोनाल्ड ट्रम्प ह्यांचा नाही...

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर जोरदार टीका का केली आहे.? (प्रत्यक्ष स्थिती माहिती नसल्याने प्रश्नचिन्ह घातलं आहे) 25 टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा आणि भारताचा उल्लेख "मृत अर्थव्यवस्था" असा केल्याने भारतीय सामान्य नागरिक आणि भारतीय राजदूत देखील संभ्रमात आहेत. "या वक्तव्यांना चिथावणी न देता गप्प राहणे आणि इतर पर्याय शोधणे हा प्रचलित दृष्टिकोन आहे." तरी देखील भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने ह्या संदर्भात "स्वतः रशिया सोबत व्यापार करता आणि इतरांना न करण्याचा सल्ला देता" असा पलटवार केला आहे. काही तज्ञांनी या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या वाटाघाटीदरम्यान अमेरिकेला सवलती देऊ करता येतील अशा क्षेत्रांवर चर्चा करण्यासाठी आर्थिक मंत्रालयांना सरकारने दिलेल्या निर्देशाकडेही त्यांनी लक्ष वेधले. हा निकडीचा एक घटक सूचित करतो की कदाचित ट्रम्प यांच्या नवीन प्रशासनाची काहीतरी चुकीची गणना किंवा चुकीची धारणा झाली असावी असे देखील तज्ञांचे मत होते. अर्थात व्यापार चर्चा सुरू करण्याच्या दिशेने भारतानेच पहिला पुढाकार घेतला होता. परंतु तेव्हापासून व्हिएतनामपासून इंडोनेशिया आणि जपानपर्यंत, तसेच युरोप आणि ब्रिटन, अशा सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांनी ट्रम्प यांच्याशी करार केले आहेत. अमेरिकेचे कोषागार सचिव स्कॉट बेसेंट यामागचा संदर्भ देताना एके ठिकाणी म्हणाले की, "भारत चर्चेच्या टेबलवर खूपच लवकर आला, पण तरीही गोष्टींना हवा तसा वेग मिळाला नाही, म्हणून मला वाटते की अध्यक्ष, संपूर्ण व्यापार संघ त्यांच्याबद्दल निराश आहे." माझा अमेरिका स्थित राजकीय जोखीम विश्लेषण आणि सल्लामसलत करणाऱ्या युरेशिया ग्रुपचा एक मित्र निखिल त्याचे असे मत आहे की ट्रम्प यांना "भारताची प्रतिमा खराब दिसावी असे वाटते, परंतु ते करारासाठी हपापलेल्या त्यांच्या स्वतःच्या हताशपणातून उद्भवले आहे." इतर कोणत्याही मुद्द्यापेक्षा ट्रम्प यांना मका, सोया, गहू आणि दुग्धजन्य पदार्थांवर टॅरिफ हवा आहे कारण ज्या राज्यांमध्ये ही पिके घेतली जातात तिथूनच त्यांना राजकीय पाठिंबा मिळत आहे. पुढे निखिल असाही म्हणतो, "ट्रम्प सोयाबिनसाठी जोरदार दबाव आणत आहेत कारण त्यांचे शेतकरी त्यांना विचारत आहेत की चीनने अमेरिकन सोयाची आयात थांबवली आहे, त्यामुळे आपल्याला काय मिळत आहे. ब्राझीलवर त्यांनी ५० टक्के कर यासाठी लादला आहे कारण ब्राझील आता चीनला सोयाचा प्रमुख पुरवठादार म्हणून उदयास आला आहे." जागतिक स्तरावर भारत २०२२ मध्ये सुमारे १३ दशलक्ष टन सोया उत्पादनात पाचव्या क्रमांकावर होता, परंतु तो खाद्यतेल बनवण्यासाठी आणि पशुखाद्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात आयात करतो. दुर्दैवाने, प्रथिनांनी समृद्ध असली तरी सोयाबिन भारतीयांमध्ये फारसे लोकप्रिय नाही. दुग्धव्यवसाय आणि गहू बाजारपेठा खुल्या करणे हे राजकीय चर्चेचा विषय असल्याने भारत सवलती देऊ शकेल का.? सेवांमध्ये राष्ट्रीय वागणूक हे आणखी एक क्षेत्र आहे जिथे ट्रम्प बदल शोधत आहेत. सध्या भारतीय कायदे परदेशी गुंतवणूकदारांपेक्षा भारतीय व्यावसायिकांना अधिक पसंती देतात. उदाहरणार्थ, अमेरिकेची सिटी बँक भारतीय बँकांपेक्षा वेगळ्या नियमांनुसार काम करते. "टेस्ला वगळता अमेरिका ज्या उच्च दर्जाच्या गाड्या देत नाही त्यावर सवलती देणे ही अशी गोष्ट आहे जी ट्रम्प खरेदी करणार नाहीत," असे तो तज्ञ मित्र निखिल म्हणतो, तसेच अमेरिकन गाड्या भारतात लोकप्रिय ठरल्या नाहीत हे देखील नमूद करतो. २०१७ मध्ये जी.एम. फूड बाहेर पडले, २०२१ मध्ये फोर्ड आणि २०२० मध्ये मोटारसायकल निर्माता हार्ले डेव्हिडसन बाहेर पडले. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की ट्रम्प यांनी अमेरिकेला मोठ्या प्रमाणात निर्यात होणाऱ्या विविध सेवा, इलेक्ट्रॉनिक्स किंवा औषध निर्मितीसाठी भारताला लक्ष्य केलेले नाही. तज्ञ मित्र निखिल यांचे असे मत आहे की ट्रम्प यांना भारताकडून खरेदी केल्या जाणाऱ्या सवलतीच्या दरात मिळणाऱ्या रशियन तेलात किंवा रशियामध्येही रस नाही, जे दिल्लीतील अनेकांच्या दृष्टिकोनाच्या विरुद्ध आहे. ट्रम्प यांचे लक्ष्य चीन आहे, त्यांची प्राथमिकता चीन आहे परंतु देशांतर्गत राजकीय चिंता वाढत आहेत आणि त्या अर्थाने, भारतासोबतचा करार त्यांना त्या मतदारांना आश्वस्त करण्यास मदत करेल. परंतु भारताला त्यांनी जाहीरपणे लक्ष्य केल्यामुळे वॉशिंग्टन डीसीमध्ये अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत आणि ट्रम्प यांना नेमकं काय साध्य करायचं आहे याबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. दिल्लीतही हाच प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारतातील सामान्य नागरिकांना देखील हाच प्रश्न पडला आहे...

ट्रम्प ह्यांना त्यांच्या राजकारणासाठी काहीही वाटत असेल तरीही भारतिय परराष्ट्र मंत्रालयाने मात्र अमेरिका आणि युरोपियन युनियनच्या टीकेनंतही रशिया कडून तेल आयात करण्याच्या भारताच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले आहे. माझ्या माहिती प्रमाणे भारताची रशियाकडून आयात ही गरजे नुसारच आहे आणि भारतीय ग्राहकांना परवडणारी आहे. पुढेही ती किंमत भारताला कशी परवडेल हेच सुनिश्चित करण्याचे भारताचे उद्दिष्ट असू शकते. ट्रम्प जसे अमेरिकेच्या राजकारणाचा आणि तिथल्या शेतकऱ्यांचा वा ग्राहकांचा विचार करतात तर भारताने तसाच विचार केला तर त्यात भारत चुकिचा कसाकाय ठरू शकतो.? म्हणजे ट्रम्प ह्यांना ते राजकारण करायला चालत तेच भारताने केलं तर त्यांना जमणार नाही हे योग्य नाही. भारताला जे परवडेल तेच भारत करेल असं मला वाटतं. भारत आता सध्याच्या स्थितीत कोणालाही घाबरणारा नाही. भारतीय नागरिक देशील सुजाण झाले आहेत. भारतानं अमेरिकेपेक्षा रशिया सारख्या देशांवर अवलंबून राहण्याची क्षमता वाढविली आहे. खर तर युक्रेन संघर्ष सुरू झाल्यावरच भारताने आयात वाढवली आहे. २०२३ मध्ये रशिया सोबत युरोपियन युनियनच्या वस्तूंमध्ये द्विपक्षीय व्यापार ६७.५ अब्ज युरो आणि सेवांमध्ये १७.२ अब्ज युरो होता, जो भारताच्या रशिया सोबतच्या एकूण व्यापरापेक्षा खूपच जास्त होता. २०२४ मध्ये रशिया कडून युरोपीय युनियनची एलएनजी आयात विक्रमी १६.५ दशलक्ष टनांवर पोहोचली. तसेच अमेरिका स्वतः देखील आपल्या अणु उद्योगासाठी युरेनियम हेक्साफ्लोराइड, इलेक्ट्रिक वाहन उद्योगासाठी पॅलेडियम, खते आणि रसायने रशियाकडून आयात करतेच की. त्यांना राजकारणही करायचं आणि उद्योगही रशिया सोबत करायचा आणि फक्त भारतानं मात्र तर करायचा नाही हे धोरण भारत आता स्वीकारणार नाही. भारताचं ऊर्जा आयात धोरण हे ऊर्जा सुरक्षा आणि भारताला परवडण्याला प्राधान्य देते, जे भारताला आणि व्यापारी दृष्टीने ग्राहकांना परवडेल तेच धोरण भारत राबवेल अशी आशा आहे. सध्या ट्रम्प निराशेच्या गर्तेत वाटतात, पाकिस्तान सोबतच त्यांचं भारताला उद्देशून केलेलं वक्तव्य हे त्यांची निराशा अजून दाखवत. भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांनी त्यांचे नाव न घेता, संसदेत सांगितल आहे की भारतावर कोणत्याही विदेशी नेत्याचा दबाव आला नाही येण्याचं काही कारण नाही. भारत सध्या कोणालाही घाबरत नाही. दुर्दैवाने भारतीय विरोधकांना भारताच्या संसदेपेक्षा विदेशी नेत्यांवर जास्त विश्वास का वाटतो हा एक स्वतंत्र चिंतनाचा विषय जरी असला तरी हा भारतीय शेतकरी मंडळींचा विषय आहे. अमेरिकेला आपल्याला हॉर्मोन्सच दूध द्यायचं आहे ज्याने आरोग्याला हानिकारक आहे, अमेरिकेला त्यांचं बियान द्यायचं आहे जे की आज स्वस्त आहे पण आपल्या भारतीय कंपन्या बुडीत निघाल्या की त्यांना त्यांचे भाव अमर्याद वाढवता येतील आणि भारतीय शेतकरी परत विदेशी शक्तीच्या हातात जाईल, अमेरिकेला वाटतं भारताची निती ही त्यांनी ठरवावी, पण आता असं घडणार नाही "भारताची निती भारत ठरवेल" अमेरिकेला असं वाटतंय की त्यांनी शेती उत्पादनात त्यांचं ऐकावं पण भारताला त्याचे भविष्याचे धोके माहिती आहेत त्यामुळे भारत सर्व सहन करू शकतो पण परत कोणत्याही बाबतीत पराधीन होऊ शकत नाही आणि ट्रम्प ह्यांना तेच हवंय हे की आजचा भारत करू शकत नाही. देशातील शेतकऱ्यांनी आणि विरोधी नेत्यांनीही एक बाब लक्षात घ्यावी ही लढाई केवळ टेरफ विरोधी नाही, ही लढाई आहे आपल्या भारतीय शेतकऱ्यांसाठीची, भारताच्या मूल्याच्या व्यवस्थेची, आणि सर्वात महत्वाचं म्हणजे राष्ट्रहिताची... तूर्तास्त इतकंच...

- विशाल वसंतराव मुळे आजेगांवकर..

# गोदावरी पात्रात अवैध वाळू उपसा पोलिसांचा छापा चाळीस लाख 49 हजाराचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई. तीन ट्रॅक्टर एक जेसीबी व वाळू साठा जप्त

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** तालुक्यातील पिंपरी( झोला) व नागठाणा शिवारातील गोदावरी नदीत पात्रात अग्रद वाळू उपसा करणाऱ्या विरुद्ध शनिवार दिनांक 6 जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाई तीन ट्रॅक्टर एक जेसीबी व वाळूसाठा जप्त करून आठ जनाविरोधात गुन्हा दाखल केल्याने वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे

याबाबत समजलेली अधिक माहिती अशी की स्थानिक गणेश शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक ६ जून रोजी पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंग परिहार पोलीस हवालदार महेश कोठारे पोलीस हवालदार राहुल परसोडे पोलीस हवालदार माणिक वाघ पोलीस हवालदार रंगनाथ दुधाटे पोलीस हवालदार सचिन भदर्गे पोलीस शिपाई शरद सावंत पोलीस शिपाई दिलीप निलपत्रेवार पोलीस शिपाई हनुमान ढगे चालक पोलीस हवालदार उत्तमराव हनवते आदींचे पथक अवैध धंद्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दत्त मंदिर परिसरातील गस्तीवर असताना पोलीस शिपाई भारत पवार पोलीस शिपाई पवन राऊत यांना भेटले त्यावेळी पिंपरी (झोला) नागठाणा शिवारात गोदावरी पात्रात जेसीबी ट्रॅक्टरच्या साह्याने अभिद्रित्या वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्या वरून पथकाने शनिवार दिनांक 6 जून रोजी सकाळी दहा वाजून 45 पिंपरी झोला नागठाणा शिवारातील गोदावरी नदीत पात्र छापा मारला असता एमएच २९बीसी 94 97 क्रमांकाचा एक जेसीबी मशीन तीन ट्रॅक्टर मध्ये वाळू भरताना दिसून आली पोलिसांचे पथक गोदावरी नदी पात्रात येत असल्याने पाहून या वाहनचालकाने वाहने जागी सोडून पळ काढला पथकाने पाणी केले असता नदी काठावर अंदाजे चाळीस ब्रास पेक्षा जास्त अधिक वाळू साठा केलेला दिसून आल्याने तहसीलदार उषा किरण शृंगारे यांनी माहिती देत मंडळ अधिकारी चंद्रकांत साळवे यांच्यामार्फत वाळू साठ्याचा पंचनामा करून पिंपरी झोला येथील पोलीस पाटील यांच्या ताब्यात वाळूसाठा देऊन वाढवणे भरलेले दोन ट्रॅक्टर सह रिकाम ऐकतात असे तीन ट्रॅक्टर व एक जेसीबी मशीन असा एकूण 40 लाख 49 हजार रुपयांचा मुद्देमाल गंगाखेड पोलीस ठाण्यात आणून पोलीस हवालदार माणिक वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तीन ट्रॅक्टरचे चालक-मालक जेसीबी चालक-मालक अशा एकूण आठ जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल लोखंडे करीत आहेत

# समुद्राच्या गाभाऱ्यातील आशेचा दीप

मानवजातीचा इतिहास हा शोध, जिज्ञासा आणि प्रगती यांच्या अखंड प्रवासाचा इतिहास आहे. प्रत्येक युगात काही शोध असे घडतात की ते केवळ वर्तमानालाच नव्हे, तर भविष्यातील अनेक पिढ्यांनाही नवी दिशा देतात. अंदमान समुद्राच्या अथांग गाभाऱ्यात सापडलेल्या नैसर्गिक वायूच्या संभाव्य साठ्यांचा शोध हा अशाच महत्त्वपूर्ण घटनांपैकी एक मानला जाऊ शकतो. ही घटना केवळ ऊर्जा क्षेत्रातील यश नाही; ती विज्ञान, संशोधन, राष्ट्रीय विकास आणि मानवी धैर्य यांच्या संगमातून साकारलेली प्रेरणादायी कहाणी आहे. समुद्र नेहमीच रहस्यांचे विशाल ग्रंथालय राहिले आहे. त्याच्या निळ्याशार पाण्याखाली असंख्य संपत्ती, असंख्य प्रश्न आणि असंख्य शक्यता दडलेल्या आहेत. या शक्यतांचा शोध घेण्यासाठी वैज्ञानिक जेव्हा अथांग सागराच्या गर्भात उतरतात, तेव्हा ते केवळ संसाधने शोधत नसतात; ते राष्ट्राच्या भविष्याचे नवे क्षितिज शोधत असतात. भारताच्या "समुद्रमंथन" संशोधन मोहिमेने याच जिज्ञासेचे आणि वैज्ञानिक दृष्टीचे उत्कृष्ट उदाहरण जगासमोर ठेवले आहे. भारतीय पुराणांतील समुद्रमंथनातून अमृत प्राप्त झाले, अशी कथा सांगितली जाते. आधुनिक विज्ञानाच्या समुद्रमंथनातून मात्र ज्ञान, ऊर्जा आणि विकासाची अमूल्य संपत्ती प्राप्त होत आहे. हा शोध भारताला ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्याची संधी देऊ शकतो. नैसर्गिक वायू हा तुलनेने स्वच्छ ऊर्जा स्रोत असल्याने उद्योग, वाहतूक, वीज निर्मिती आणि विविध विकास प्रकल्पांना नवी गती मिळू शकते. जगाच्या इतिहासातही अशा शोधांनी अनेक राष्ट्रांचे भविष्य बदलले आहे. नॉर्वेने उत्तर समुद्रातील तेलसंपत्तीचा सुयोग्य वापर करून समृद्धीचा आदर्श निर्माण केला. अमेरिकेतील शेल गॅस क्रांतीने ऊर्जा क्षेत्रात नवे परिवर्तन घडवले. या उदाहरणांप्रमाणे भारतालाही वैज्ञानिक नियोजन, पर्यावरणीय जबाबदारी आणि दूरदृष्टी यांच्या आधारावर या संधीचे रूपांतर राष्ट्रीय विकासात करता येऊ शकते.

मात्र विकासाच्या या प्रवासात पर्यावरणाचे महत्त्व विसरून चालणार नाही. सागरी जैवविविधता, समुद्री परिसंस्था आणि निसर्गाचे संतुलन यांचे संरक्षण करणे तितकेच आवश्यक आहे. खरा विकास तोच जो समृद्धी आणि शाश्वतता यांचा सुंदर समन्वय साधतो.

हा शोध आपल्याला एक चिरंतन संदेश देतो—पृथ्वीच्या गाभाऱ्यात जशी अमूल्य संपत्ती दडलेली असते, तशीच मानवी बुद्धिमत्ता, जिद्द आणि क्षमता यांच्यामध्येही अपरिमित शक्यता दडलेल्या असतात. विज्ञानावरील विश्वास, संशोधनातील सातत्य आणि नवसर्जनाची वृत्ती यांमुळे अशक्य वाटणारी स्वप्नेही वास्तवात उतरू शकतात.

अंदमान समुद्रातील हा शोध म्हणजे केवळ नैसर्गिक वायूचा शोध नाही; तो आशेचा, आत्मविश्वासाचा आणि उज्ज्वल भविष्याचा दीप आहे. समुद्राच्या अथांग अंधारात सापडलेला हा प्रकाश भारताच्या विकासयात्रेला नव्या क्षितिजांकडे घेऊन जाऊ शकतो आणि जगासाठीही शाश्वत प्रगतीचे प्रेरणादायी उदाहरण ठरू शकतो.

**लेखक :** पांडुरंग मारुती धुमाळ

# मराठी शिकण्यासाठी अमराठी चालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## 15 ऑगस्टपर्यंत मराठी शिकणे अनिवार्य

**मुंबई :** महाराष्ट्राच्या मातृभाषेचा सन्मान राखत आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व आत्मीय करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या अमराठी चालकांसाठीच्या व्यवहारिक मराठी शिकवणी वर्गांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मराठी भाषा शिकण्यासाठी अमराठी चालकांमध्ये दिसून येणारा उत्साह खरोखरच वाखाणण्याजोगा आहे, असे गौरवोद्गार परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काढले. परिवहन विभागाच्या पुढाकारातून आणि कोकण मराठी साहित्य परिषद तसेच मुंबई साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १ जूनपासून मुंबई महानगर क्षेत्रात अमराठी चालकांसाठी व्यवहारिक मराठीचे विशेष वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमासाठी तब्बल साडेचार हजारांहून अधिक शिक्षकांची फळी उपलब्ध करून देण्यात आली असून, अनेक रिक्षा व टॅक्सी संघटनांनीही सामाजिक बांधिलकी जपत या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. शहरातील विविध भागांमध्ये चालकांच्या सोयीच्या वेळेनुसार वर्गांचे आयोजन करण्यात येत असून, या वर्गांमध्ये चालक स्वयंस्फूर्तीने उपस्थित राहून मराठी भाषेतील दैनंदिन संवाद, व्यवहारातील शब्दप्रयोग आणि प्रवाशांशी सुसंवाद साधण्याची कला आत्मसात करत आहेत. मराठी शिकण्याची त्यांची तळमळ आणि जिद्द ही महाराष्ट्राच्या भाषिक ऐक्याचे सुंदर प्रतीक ठरत आहे.

येत्या १५ ऑगस्टपर्यंत अमराठी चालकांना व्यवहारिक मराठी शिकणे अनिवार्य करण्यात आले आहे. मंत्री प्रताप सरनाईक (Pratap Sarnaik) यांनी दिलेल्या निर्देशानुसार १६ ऑगस्ट पासून प्रवाशांशी मराठीत संवाद साधून न शकणाऱ्या चालकांना परिवहन विभागाच्या कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. अर्थात , या निर्णयाचे महत्त्व ओळखून विविध चालक-मालक संघटनांनी स्वतःहून पुढाकार घेत प्रशिक्षण वर्गांचे आयोजन सुरू केले आहे. शासन, साहित्य संस्था आणि वाहतूक क्षेत्रातील संघटना यांच्या समन्वयातून हे अभियान आता एका व्यापक लोकचळवळीचे स्वरूप धारण करत आहे.

# मंत्री जर चुकत असेल तर ठोकल्याशिवाय राहू नका, बच्चू कडू यांचे शिवसैनिकांना थेट आवाहन

**गोंदिया :** राज्याच्या राजकारणात दररोज नवनवीन घडामोडी पहायला मिळत आहेत. आज गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे शिवसेनेकडून कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राज्याचे मंत्री भरत गोगावले, मंत्री आशिष जयस्वाल तसेच शिवसेना नेते व आमदार बच्चू कडू उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांना आगामी राजकीय घडामोडी, संघटनात्मक बांधणी इतर मुद्द्यांवर मार्गदर्शन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी भाषण करताना बच्चू कडू यांनी मंत्री जर चुकत असेल तर ठोकल्याशिवाय राहू नका असंही विधान केलं आहे. बच्चू कडू यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात.

एकनाथ शिंदे यांचे कौतुक

शिवसेनेच्या मेळाव्यात भाषण करताना बच्चू कडू यांनी म्हटले की, 'माझ्यासमोर अनेक पक्षांमध्ये जाण्याच्या वाटा मोकळ्या होत्या. आमचा स्वतंत्र पक्ष होता, अनेक पक्षांमध्ये जाऊन आम्हाला आमचं स्थान निर्माण करता आलं असतं. पण आम्हाला एकनाथ शिंदे खऱ्या अर्थाने मर्द वाटले. त्यांच्याशिवाय दुसरा मर्द नाही त्यामुळे आम्ही शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. एकनाथ शिंदे रात्री दोन वाजता मदतीसाठी हजर असतात. मुख्यमंत्री असतानाही रात्री अडीच वाजता शेतकऱ्यांना भेटणं ही एकनाथ शिंदे यांची खरी ओळख आहे. हीच ओळख आम्हाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याला न्यायची आहे.'

पुढे बोलताना बच्चू कडू यांनी म्हटले की, एक सेवाभावी माणूस आम्ही पाहत आहोत. शेवटच्या टोकापर्यंत त्याचा आवाज, त्याचा संवाद, त्याची प्रामाणिकता, त्याचे व्यक्तिमत्व नेण्याचे काम आम्हाला करावं लागणार आहे. मित्रांनो तुम्ही-आम्ही सत्तेत आहोत म्हणून सुस्त राहता कामा नये.

# मराठवाड्यातील पहिल्या शिवसेना शाखेच्या 41 व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## गुलमंडी येथे ध्वजारोहण, सत्यनारायण महापूजा व स्वरराज ऑर्केस्ट्रासह विविध कार्यक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, मराठवाड्यात सर्वप्रथम स्थापन झालेल्या शिवसेना शाखेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे रविवारी (दि. ८) विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

८ जून १९८५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील गुलमंडी परिसरात मराठवाड्यातील पहिली शिवसेना शाखा स्थापन झाली होती. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी वर्धापन दिन साजरा केला जातो. यंदा ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त सकाळी ९.३० वाजता शाखा कार्यालयात ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता सत्यनारायण महापूजा होणार असून, प्रसिद्ध गायक व संगीतकार प्रमोद सरकटे यांच्या 'स्वरराज ऑर्केस्ट्रा'चा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.




शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांमधून प्रेरणा घेत मराठवाड्यात शिवसेनेची मुहूर्तमेढ छत्रपती संभाजीनगरातून रोवली गेली. गेल्या चार दशकांत पक्षाने सामाजिक, राजकीय आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढविला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये शिवसेनेने प्रभावी उपस्थिती नोंदविली असून, सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून लढण्याची परंपरा पुढेही कायम ठेवली जाईल, असेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे, उपनेते सुभाष पाटील, राज्य संघटक चेतन कांबळे, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, अनिल चोरडिया, माजी महापौर सुदाम सोनवणे, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, विभागीय सचिव धर्मराज दानवे यांच्यासह शिवसेना, युवासेना व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## सिद्धी रवंदळे 'डॉ. सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक परीक्षेत' यश

### 'इस्रो' सहलीसाठी झाली निवड!



**परभणी:** जनसेवा प्रतिष्ठान, अहमदनगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'डॉ. सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक परीक्षा २०२६' चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये परभणी येथील बाल विद्या मंदिर हायस्कूलची इयत्ता ८ वीची विद्यार्थिनी कु. सिद्धी सुरेश रवंदळे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. सिद्धीने या विज्ञान परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत परभणी तालुक्यात 'प्रथम क्रमांक' पटकावला असून, राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतही आपले नाव कोरले आहे. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे तिला भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) विशेष सहलीची आणि विज्ञान कार्यशाळेची सुवर्णसंधी मिळाली आहे. सिद्धीचे वडील सुरेश रवंदळे हे आदर्श शिक्षक असून, तिचे काका हे पूर्णा येथील प्रतिष्ठित विद्या प्रसारिणी सभेचे हायस्कुल शाळेचे क्रीडा शिक्षक आहेत. कुटुंबातील शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील याच संस्कारांमुळे सिद्धीने हे मोठे यश मिळवले आहे.

५ एप्रिल २०२६ रोजी ही परीक्षा पार पडली होती. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळावी, या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन केले जाते. सिद्धीने मिळवलेल्या या अभूतपूर्व यशामुळे तिच्या शाळेचे आणि संपूर्ण परभणी जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. तिच्या या यशाबद्दल परीक्षा प्रमुख ए. व्ही. तुपविहिरे, संस्थेचे संचालक एम. एल. जाधव, बाल विद्या मंदिर शाळेचे सचिव माननीय डॉक्टर श्री विवेक नावंदर, व मुख्याध्यापक श्री अरुण बोराडे सर यांच्यासह सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवून जिल्ह्याचा गौरव वाढवल्याबद्दल कु. सिद्धी सुरेश रवंदळे हिचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात असून, तिच्या आगामी 'इस्रो' सहलीसाठी आणि विज्ञान कार्यशाळेसाठी तिला खूप खूप शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### फर्दापूर पोलीसांची मोठी कारवाई

## दोन वाहनांसह सुमारे 11.24 लाखांचा मुद्देमाल जप्त

**फर्दापूर :** फर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये अवैध गौण खनिज वाहतूक व अवैध मद्य वाहतुकीविरोधात धडक कारवाई करत दोन वाहनांसह सुमारे ११ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पहिल्या कारवाईत छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील सोयगाव फाटा येथे पोलिसांनी संशयित टिप्पर क्रमांक एमएच-20 बीयू-4775 याची तपासणी केली. तपासणीदरम्यान सदर वाहनामध्ये कोणतीही वैध परवानगी नसताना सुमारे चार ब्रास गौण खनिज (वाळू) वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या गौण खनिजाची किंमत अंदाजे १६ हजार रुपये, तर टिप्परची किंमत अंदाजे १० लाख रुपये असून, एकूण १० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक सचिन पंढरीनाथ गावंडे (रा. पाथ्री, ता. फुलंब्री) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील तोंडापूर फाटा येथे कार क्रमांक एमएच-12 डीवाय-2615 थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी वाहनामध्ये अवैधरित्या वाहतूक करण्यात येत असलेल्या टँगो पंच देशी मद्याच्या २०० बाटल्या आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या मद्याची किंमत अंदाजे ८ हजार रुपये, तर कारची किंमत अंदाजे १ लाख रुपये असून, एकूण १ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. दोन्ही प्रकरणांतील आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास फर्दापूर पोलीस करीत आहेत. अवैध खनिज वाहतूक व मद्य तस्करीविरोधात फर्दापूर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### अवैध चक्री जुगार अड्ड्यावर छापा, 9 जण ताब्यात

**छत्रपती संभाजीनगर :** स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील दिवसी पिंपळगाव शिवारातील दोन ठिकाणी अवैध चक्री जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत ९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून ६९ हजार ९६० रुपये रोख रक्कम, ९ मोबाईल फोन, दोन संगणक संच व इतर साहित्य असा एकूण २ लाख ३४ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे व त्यांच्या पथकाने केली.

### ऑपरेशन यात्री सुरक्षा व अमानत मध्ये.रेल्वे सुरक्षा बलाची उल्लेखनीय कामगिरी

## हरवलेला मोबाईल मालकाकडे सपुर्द, संशयित आरोपी ताब्यात



**परभणी :** रेल्वे प्रवाशाची सुरक्षा व मालमत्तेचे संरक्षण आणि रेल्वे परीक्षा गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावीपणे निमंत्रण ठेवण्यासाठी रेल्वे सुरक्षा बल देशभरात सुरू केलेल्या "ऑपरेशन यात्री सुरक्षा. व अमानत " या विशेष नमे अंतर्गत नांदेड विभागाच्या पथकाने परभणी रेल्वे स्थानकावर दोन महत्त्वपूर्ण एसएससी कारवाया करून प्रवासाचा विश्वास आणि दृढ केला आहे. संशेत आरोपी ताब्यात घेणे आणि हरवलेल्या महागडा मोबाईल शोधून मालकाकडे सुपुत्र परत करणे या दोन्ही कार्यामुळे रेल्वे सुरक्षा बलाच्या दक्षता आणि कार्यक्षमतेचा तत्परतेता या उल्लेखनीय कामगिरीच्या उल्लेखनीय बाब आहे.

रेल्वे सुरक्षा बलपमेंट प्राप्त माहितीनुसार पाच जून 2026 रोजी सीबीआय क्राइम इंटेलिजन्स ब्रांच नांदेड विशेष पथक रेल्वे प्रवाशाच्या मालमत्तेची चोरी करण्याऱ्या संशयित व्यक्तीवर लक्ष ठेवून होते. रेल्वे स्थानक परिसरात वाढत्या प्रवासी गर्दीच्या पार्श्वभूमीवर संशयित व्यक्तीच्या हालचालीवर बारकाईने नजर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. एस आय पी एफ दिलीप कांबळे / सीबीआय / नांदेड/ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अमोल वावळे ए एस आय पी एफ / सीबीआय / नांदेड हे परभणी रेल्वे स्थानका परिसरात गस्त घालत असताना गाडी क्रमांक 17 6 29 पुणे हुजूर साहेब नांदेड एक्सप्रेस स्थानकावर थांबली होती प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर प्रवाशाची मोठी गर्दी असताना एका व्यक्तीच्या स्वयंशास्पद हालचालीवरून निदर्शनास आल्या सदरील व्यक्ती सामान्य डब्याजवळ वारंवार फिरत असल्यास दिसून आले व प्रवाशाची चढउतारा गर्दीचा फायदा घेऊन चोरी करण्याच्या उद्देशाने तो थांबला असल्याबाबत संशय निर्माण झाल्याने त्याच्यावर गुप्तपणे नजर ठेवण्यात आली चौकशी आणखी संतोष वय 27 वर्ष राहणार परभणी पुढील कायदेशीर कारवाई जी आर पी. परभणी यांच्या स्वाधीन करण्यात आले. जीआरपी परभणी आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 110 व 117 अनवे गुन्हा क्रमांक 197 / 2026 दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे रेल्वे परिसरात संशय हालचाली करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध यापुढे कठोर कारवाई रेल्वे सुरक्षा बलाने स्पष्ट केले आहे. ऑपरेशन अंतर्गत रेल्वे सुरक्षा बलाने प्रवाशांसाठी दिलासादायक ठरणारी आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केली दुपारी च्या सुमारास 1.15 वाजून पंधरा मिनिटानी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक तीन वरील कॅन्टीन परिसरात गुप्त पाहणी सुरू केली असताना श्री अमोल वावळे व जीआरपी कर्मचाऱ्यांना एक बेवारस मोबाईल फोन आढळून आला. प्राथमिक तपासणी सदर मोबाईल रियल मी कंपनीचा असून त्याच्या अंदाजे किंमत पंचवीस हजार रुपये असल्याचे स्पष्ट झाले मोबाईल हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी रेल्वे सुरक्षा बल व जीआरपी कर्मचाऱ्यांनी तातडीने आवश्यक परताळणी प्रक्रिया सुरू केली मोबाईल मधील उपलब्ध माहिती संपर्क तपशील आणि तांत्रिक पडताळणीच्या आधारे संबंधित मालकाचा शोध घेण्यात यश आले. मालकाची खात्री पटल्यानंतर सदर मोबाईल जीआरपी कार्यालय परभणी येथे संबंधित मूळ मालकाकडे सुपूर्द करण्यात आला हरवलेला महागडा मोबाईल सुरक्षितपणे परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी रेल्वे सुरक्षा बल आणि जीआरपी कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले सदर रेल्वे स्टेशनवर भिकारी व वेडसर माणसांचा स्टेशनमध्ये गर्दी केल्याने यांचा बंदोबस्त रेल्वे सुरक्षा दल व जीआरपी यांनी करावा अशी रेल्वे प्रवाशाकडून मागणी होत आहे.

## विद्यापीठ कॅम्पसमध्ये आज 'ओपन डे' ज्ञानभांडार सर्वांसाठी राहणार खुले

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर,** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विविध विभागात सुरु असलेले अभ्यासक्रम, संशोधनाचे ज्ञान भांडार विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींसाठी सोमवारी (दि. आठ) 'ओपन डे च्या माध्यमातून खुले ठेवण्यात येणार आहे.

विद्यापीठ नाटयगृहाशेजारील नवीन नाटयमंदिरात ५ व ६ जून रोजी 'एज्युकेशन एक्सपो' अर्थात 'प्रज्ञावेध-२०२६' घेण्यात आला. यानंतर आता ओपन डे ठेवण्यात आला आहे. सन २०२६-२७ हे शैक्षणिक वर्ष सुरु झाले असून यंदा अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम, व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम होणार आहेत. विद्यापीठांतील विभागांची क्षमता, संशोधन, अभ्यासक्रम , रोजगाराच्या संधी या संदर्भात विद्यार्थी, पालकांना विस्तृत माहिती व्हावी, या उद्देशाने 'एज्यूकेशन एक्स्पो, प्रज्ञावेध-२०२६' आयोजित करण्यात आला. प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते यांच्यासह सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी, अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक यांची उपस्थिती राहील.

**विद्यार्थी, पालकांना आवाहन**

'एज्युकेशन एक्सपो'च्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी यांनी ५ व ६ जून रोजी सुमारे तीन हजार विद्यार्थी पालकांनी भेट दिली. तसेच सोमवारी 'ओपन डे' निमित्त संबधित विभागांना भेट द्यावी. बारावी उत्तीर्ण व पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेले अभ्यासक्रम, संशोधनाच्या व अभ्यासक्रमांनानंतर रोजगाराच्या संधी या विषयीची माहिती या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**उपक्रमात सहभागी विभाग**

दिनदयाळ उपाध्याय कौशल केंद्र (डीडीयुकेके), योगशास्त्र, जीवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, वनस्पतीशास्त्र, रसायन तंत्रशास्त्र, रसायनशास्त्र, वाणिज्यशास्त्र, संगणकशास्त्र, नाटयशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, इंग्रजी, पर्यावरणशास्त्र, ललित कला, विदेशी भाषा, न्यायवैद्यक शास्त्र, भुगोल, हिंदी, इतिहास, पत्रकारिता, ग्रंथालयशास्त्र, आजीवन शिक्षण, व्यवस्थापनशास्त्र, समाजकार्य, मराठी, गणित, जीवरसायनशास्त्र, सुक्ष्म तंत्रज्ञान, विधि, पाली, पदार्थविज्ञान, राज्यशास्त्र, मुद्रण तंत्रज्ञान, मानसशास्त्र, लोकप्रशासन, संस्कृत, समाजशास्त्र, संख्याशास्त्र, फुले-डॉ.आंबेडकर विचारधारा, पर्यटन प्रशासन, उर्दू, प्राणीशास्त्र, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, जल व भूमी व्यवस्थापन आदी विभागांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर परिसरातील ४५ विभागांना सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत भेट देता येणार आहे. विभागात सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची माहिती या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या ठिकाणी पदवी चे ३० व पदव्यूत्तरचे ८० असे जवळपास ११० अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम एईडीपी व बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांची माहितीही संबंधित विभागात देण्यात येणार आहे.

## सैन्यदलातील नांद्रा गावचे सुपुत्र हरिष सुभाष गवादे यांची सुभेदारपदी पदोन्नती

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.७ जून :** नांद्रा तालुका पाचोरा येथील भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेले नांद्रा गावचे सुपुत्र हरिष सुभाष गवादे यांची नुकतीच सुभेदारपदी पदोन्नती झाली आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संपूर्ण गावातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून,कमी वयात सुभेदार पद प्राप्त करून त्यांनी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.हरिष सुभाष गवादे हे गेली २४ वर्षे भारतीय सैन्यात देशसेवा बजावत आहेत. आपल्या सेवाकाळात त्यांनी भारतातील विविध संवेदनशील भागांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. याशिवाय त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत (यूएन मिशन,काँगो) सेवा बजावून देशाचा गौरव वाढविला आहे.


त्यांच्या शौर्यपूर्ण,उत्कृष्ट आणि कर्तव्यनिष्ठ सेवेबद्दल त्यांना विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.देशसेवेसाठी असलेली त्यांची निष्ठा,कर्तव्यदक्षता आणि नेतृत्वगुण यांमुळे त्यांनी सैन्यात विशेष ओळख निर्माण केली आहे.

सुभेदारपदी पदोन्नती झाल्याची बातमी समजताच गावातील अग्निपंख क्लासेसचे संचालक घनश्याम खैरनार (आप्पा)यांनी त्यांचा सत्कार करून स्मृतिचिन्ह प्रदान केले व अभिनंदन केले.तसेच विद्यार्थ्यांना सैन्यदलातील संधी, अनुभव आणि मार्गदर्शन मिळावे यासाठी त्यांनी गवादे यांना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची विनंती केली. हरिष सुभाष गवादे यांच्या रूपाने आपल्या गावाचे नाव उज्ज्वल झाले असून ते तरुण पिढीसाठी प्रेरणास्थान आहेत,असे गौरवोद्गार खैरनार यांनी यावेळी काढले.

याचबरोबर गावातील समाजसेवक गणेश दशरथ पाटील (भोला भाऊ) यांनीही त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला.त्यांच्या पदोन्नतीनिमित्त अभिनंदनाचे भव्य फलक उभारून त्यांनी आपल्या आनंदाची आणि अभिमानाची भावना व्यक्त केली.हरिष सुभाष गवादे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा,नांद्रा येथे झाले. घरची आर्थिक परिस्थिती सामान्य असतानाही त्यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर सैन्यात भरती होण्याचे स्वप्न साकार केले.त्यांचे वडील सुभाष रामकृष्ण गवादे हे सेवानिवृत्त सैनिक असून आई गृहिणी तर मोठा भाऊ महेश गवादे जिल्हा परिषद शिक्षक आहेत.

हरिष सुभाष गवादे यांची ही यशस्वी वाटचाल गावातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून,त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## कतली साठी जाणारे 18गोवंश पोलिसांची ताब्यात; एकावर पोलिसात गुन्हा दाखल



हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** दरम्यान जिल्ह्यात घोष कतल आणि जनावराच्या अवैध वाहतूक विरोधात पोलीस प्रशासनाने अलीकडे च्या काळात आक्रमक भूमिका घेतली असून पोलीस अधीक्षक पंकज कुमार कुमावत यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने होत असलेल्या धडक कार्यवायामुळे अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांमध्ये भीतीचे. वातावरण निर्माण झाले आहे तरीही चोरून लपूण गोवंश कतलीचे प्रकार उघडतीस येत आहेत . घरातील मृत्यूचा कॉलनी परिसरात कत्तलीसाठी आणून ठेवण्यात आलेल्या 18 गोवंश जनावरांची सुटका करून पाथरी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे .

पोलिसांच्या या तत्पर आणि प्रभावी कारवाईमुळे सर्व स्तरातून कौतुक होत आहे पोलिसांनी शनिवारी दिनांक ६ जून रोजी सायंकाळी सहा वाजून सुमारास गुप्त माहिती मिळाली की मृत्यूचा कॉलनी येथील मच्छी समोर मोकळ्या जागेत व शेडमध्ये काही गुण जनावरे कसलीसाठी आणून बांधून ठेवण्यात आलेले आहेत या माहितीची खातर जमा करून वरिष्ठ पोलीस अधिकारी च्या मार्गदर्शनाखाली रात्री पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी रवाना झाले पोलीस अधीक्षक पंकज कुमार कुमावत अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दीपक कुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसाब स्वामी आणित्याच्या सहकाऱ्यांनी. सायंकाळी सुमारे सात वाजण्यास सुमारास यावेळी मोकळ्या जागेत व शेडमध्ये बांधून ठेवलेले कसले साठी आणलेले एकूण 18 गुण जनावरे आढळून आली पोलिसांनी तात्काळ जनावरांना ताब्यात घेत त्यांचे सुटका केली याप्रकरणी नूरमिया शाबुद्दीन कुरेशी व 68 वर्ष राहणार मुर्तुजा कॉलनी पाथ्री यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे पुढील तपास चालू आहे

## घाटी रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ शिवाजी सुक्रे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



**खुलताबाद :** छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाच्या विकासात मोलाचे योगदान देणारे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा वाढदिवस विविध उपक्रम राबवून वृक्षारोपण, सामाजिक बांधिलकी जपणारे आणि जनहिताच्या कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थित डॉ. सुक्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली घाटी रुग्णालयात झालेल्या विविध विकासकामांचा आणि रुग्णसेवेतील सकारात्मक बदलांचा गौरव करण्यात आला. वाढती रुग्णांची संख्या डॉक्टरांची अपुरी संख्या इतर कर्मचाऱ्यासह व त्यावरील मात करून येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना सेवा देण्याचे काम आपण प्रामाणिकपणे आपल्या सहकार्यासह करत असल्याची प्रतिक्रिया डॉक्टर सुक्रे यांनी दिली.( मी मागील काही दिवसापूर्वी घाटी रुग्णालय येथे डोक्याच्या विलाजासाठी गेले असता त्या ठिकाणच्या अपघात विभागातील ओपीडीत संबंधित डॉक्टरांनी सिटीस्कॅन व काही तपासण्या करण्यासाठी सांगितल्या होत्या. परंतु त्या तात्काळ करणं गरजेचे होत्या परंतु पेशंटची अवस्था बघून शक्य नव्हते . त्याच वेळेस ओपीडी राऊंड साठी आलेले घाटी अधिष्ठान डॉक्टर शिवाजी सुक्रे यांनी पेशंटची अवस्था बघून तात्काळ सिटीस्कॅन करून घेण्याची संबंधित डॉक्टरांना आदेशित केले. व काही अडचण आल्यास स्वतः मोबाईल नंबर देऊन त्यावर संपर्क करा किंवा मेसेज पाठवा असे सांगितले त्यामुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य रुग्णाला दिलासा मिळाला. ही माझ्या आयुष्यातील घाटीतील अस्मरणीय आठवण राहील श्री ज्योती संतोष करपे खुलताबाद )

( घाटी रुग्णांच्या येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना येणाऱ्या आडी अडचणी हक्कानी सहज मांडून त्या सोडून आपल्या रुग्णांना लवकर चांगला उपचार मिळून देणारे व आपुलकी आपलेपणा दाखवून त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना मोलाच सहकार्य करणारे घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ शिवाजी शुक्रे हे हक्काचे सहकार्य करणारे व्यक्तिमत्व आहे. ह भ प नारायण भांबर्डे महाराज हडको टीव्ही सेंटर छत्रपती संभाजी नगर)

छत्रपती संभाजी नगर घाटी रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्ण माझ्यासाठी व रुग्णालयातील जबाबदार संबंधितांसाठी महत्त्वाचा असून वृक्षारोपणासह पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत साजरा करण्यात आलेला हा वाढदिवस समाजाप्रती असलेल्या त्यांच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला. डॉ. सुक्रे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

## सय्यद शहाबुद्दीन कादरी यांची ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग राज्य जिल्हा सदरपदी नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग महाराष्ट्रच्या वतीने सय्यद शहाबुद्दीन कादरी यांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा सदरपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ऑल इंडिया उलेमा बोर्डचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना नौशाद सिद्दीकी आणि महासचिव अल्लामा बुनई हसनी यांच्या निर्देशानुसार करण्यात आली आहे.

ऑल इंडिया उलेमा बोर्ड वक्फ विंग महाराष्ट्रचे सदर शेख आसिफ महबूब यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून सय्यद शहाबुद्दीन कादरी यांच्यावर जिल्हा सदरपदाची जबाबदारी सोपवली.

या नियुक्तीबद्दल ऑल इंडिया उलेमा बोर्ड शहराध्यक्ष अशरफ पठाण यांनी सय्यद शहाबुद्दीन कादरी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली वक्फ संपत्तींचे संरक्षण, समाजहिताचे प्रश्न आणि संघटनेचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नियुक्तीपत्रात नमूद केल्यानुसार, सय्यद शहाबुद्दीन कादरी हे देशहित, समाजहित आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी निष्ठेने कार्य करतील. तसेच वक्फ संपत्तींचे संरक्षण, सुरक्षा आणि त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी सक्रियपणे काम करतील, अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## एमजीएम विद्यापीठ आणि ग्रीव्ह्ज कॉटन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी मोफत पदविका अभ्यासक्रम सुरु

### विद्यार्थिनींना दिली जाणार 100% शिष्यवृत्ती

छत्रपती संभाजीनगर, दि.७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि ग्रीव्ह्ज कॉटनच्या पिगमेलियन फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल टाकत स्वाती (स्किल्स फॉर विमेन ॲडव्हान्समेंट अँड ट्रेनिंग इनिशिएटिव्ह) उपक्रमांतर्गत दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम मोफत सुरू करण्यात आला आहे.

महिलांना उद्योग सुसंगत व्यावसायिक शिक्षण, रोजगारक्षम कौशल्ये तसेच उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणातील दर्जा, कॉर्पोरेट नेतृत्व आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समन्वय साधण्यावर या पदविका अभ्यासक्रमात भर देण्यात येणार आहे.

या पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी महिला १२ वी उत्तीर्ण आणि १७ ते २५ वयोगटातील असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमासाठी असलेले शुल्क शिष्यवृत्ती देऊन माफ करण्यात येणार असून यासाठी ६ लक्ष रुपयांच्या उत्पनाची अट असणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्णपणे निवासी असणार असून राहणे, जेवण आणि इतर सर्व संबंधित बाबींचा खर्च काहीही असणार नाही.



या संवादात एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अभ्यासक्रम निर्मिती, अनुभवाधारित शिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराभिमुख संधी निर्माण करण्यात येणार आहे. विशेषतः दुर्लक्षित व वंचित घटकांतील महिलांना भविष्यासाठी सज्ज कौशल्ये, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने 'स्वाती' उपक्रमांतर्गत सुरू होणारा पदविका अभ्यासक्रम महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. त्याचप्रमाणे या पदविका अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकास, महिलाकेंद्रित कौशल्यविकास आणि उद्योगसंलग्न शिक्षणाबाबतची ठाम बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाच्या संदर्भातील सामंजस्य करार ग्रीव्ह्ज कॉटन लिमिटेडचे अध्यक्ष करण थापर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.हरिरंग शिंदे, संचालिका डॉ.परमिंदर कौर, ग्रीव्ह्ज कॉटनच्या शेफाली सुरी, पिगमेलियन फाऊंडेशनचे अर्पित आस्थाना, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी





सोयगाव - सावळदबारा तालुका सोयगाव येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि.७ रविवार रोजी भोकरदन येथे जाऊन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची घेतली सदिच्छा भेट

# महागाईविरोधात शिवसेनेचा एल्गार; क्रांती चौकात जनआक्रोश आंदोलन

## शिवसेना नेते अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली संपन्न झाले आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर :** वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि राज्य सरकारने घोषित केलेल्या फसव्या कर्जमाफी विरोधात शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रविवार, 7 जून रोजी क्रांती चौक येथे जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली हे आंदोलन संपन्न झाले.

सर्वप्रथम शिवसैनिकांनी सायकलवरून प्रतीकात्मक फेरी काढून इंधन दरवाढीचा निषेध व्यक्त केला. वाढत्या पेट्रोल-डिझेल दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर वाढत असलेल्या आर्थिक बोजाकडे सरकारचे लक्ष वेधले. तसेच रिकामे गॅस सिलिंडर आणून घरगुती गॅसच्या दरांविरोधात शिवसैनिकांनी तीव्र संताप व्यक्त केला.

बहुत हुई महंगाई की मार, हटा डालो मोदी सरकार", "अच्छे दिन नाहीत, महंगे दिन", "महागाई हटवा... मोदी हटवा", "इंधन दरवाढ रद्द करा", "शेतकऱ्यांची कर्जमाफी नव्हे, ही तर कर्जवसुली" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. शिवसैनिकांनी हातात भगवे झेंडे, फलक व बॅनर घेऊन केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन असह्य झाल्याने शिवसैनिकांनी गॅस सिलेंडर उलटा ठेवून त्याची आरती केली. महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी हातात ताटे व बेलणे घेऊन सरकारविरोधात बोंब मारत महागाईविरोधात रोष व्यक्त केला. तर अनेक शिवसैनिक टाळ घेऊन आंदोलनात सहभागी झाले होते.

राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांना फसवणारी असून शिवसैनिकांनी हा कर्जमाफीचा शासकीय अध्यादेश जाळला. शिवसैनिकांनी अध्यादेश जाळून राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविला.

महागाईमुळे शेतकरी, कामगार, महिला आणि




मध्यमवर्गीय कुटुंबे आर्थिक डबघाईला आले आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने महागाई नियंत्रणात आणून जनतेला दिलासा द्यावा, अन्यथा शिवसेना आंदोलन अधिक तीव्र करेल, असा इशाराही अंबादास दानवे यांनी केंद्र व राज्य सरकारला दिला.

महिलांचे प्रतिनिधित्व म्हणून फक्त सुषमा वाघ या तरुणीने भूमिका मांडली. वाढती महागाई, शेतकऱ्यांची फसवी कर्जमाफी आणि युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नाबाबत सुषमा वाघ हिने अनेक प्रश्न उपस्थित केले. महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले असून सरकारकडे युवकांच्या भविष्याबाबत कोणतेही ठोस धोरण नाही. शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माध्यमातून तरुणांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष युवकांना करावा लागेल असे आवाहन वाघ या तरुणीने केले.

याप्रसंगी शिवसेना उपनेते सुभाष पाटील, सह संपर्कप्रमुख राजेंद्र काळे, जिल्हा संघटक सुनील शिंदे, उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील, संतोष खेंडके, किशोर कच्छवाह, विठ्ठल बदर, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, तालुकाप्रमुख शंकर ठोंबरे, संजय मोटे, मनोज पेरे, सोमीनाथ करपे, विष्णू जाधव, तालुका संघटक मनोज गायके, विधानसभाप्रमुख प्रमोद ठेंगडे, विधानसभा संघटक गिरीश चपळगावकर, वीरभद्र गादगे, गोपाल कुलकर्णी, नगरसेवक सचिन खैरे,उपशहरप्रमुख संदेश कवडे, बापू कवडे, मंगेश भाले, गोरख सोनवणे, दिनेश राजे भोसले, नितीन पवार, प्रकाश कमलाणी, सुरेश गायके,सचिन वाघ,सुरेश पवार, दीपक महाडिक,किशोर साबळे, जयसिंग होलिये, योगेश शर्मा, नरेश दैवत्ववाल, सुधीर जाधव, जगदीश वेताळ, गजेंद्र दळवी, पुरुषोत्तम पानपट, शिवाजी ठेंगडे, गणेश सुरे, पृथ्वीराज राठोड, नारायण मते, बाळू गडवे, रवि गायकवाड, किरण सालपे, दीपक तांबे, देविदास रत्नपारखी, रणजीत दाभाडे, भारत ढवळे, सतीश कटकटे, विनोद लोखंडे, नारायण जाधव, शिवकुमार देशमुख, मयूर तुपे, वैजीनाथ म्हस्के, सलीम खामगावकर, कांता टेमकर, रावसाहेब टेके, गोविंद वल्ले, संदीप हिरे, मनोज सोनवणे, शिवाजी आपरे, निवृत्ती पळसकर, विकास गोरडे,प्रल्हाद घुगे, संतोष सांगळे, व्यंकटेश वानखेडे, शिवाजी बचाटे,सुनील कडवे, संजीवन सरोदे, निखिल बारवाल, नितीन भरे, भगवान उंटवाल, सागर बारवाल, ज्ञानेश्वर साठे, मनीष सरोसे, कुणाल पाठक, मदनराव चौधरी, दत्ता उकिरडे, सांडू पाटील मते, बाळू भोसले, सुरेश नाडे, विशाल चौधरी, राजू ठोंबरे, बबनराव वाघ, संदीप कुमावत, सुरज काथार, ज्ञानेश्वर शेळके, प्रतीक अंकुश, मधुकर घोरपडे ,सुंदर साळवे,भाऊसाहेब चव्हाण,विजय दाभाडे, महिला आघाडी महानगर संघटक सुकन्या भोसले, मीना फसाटे, दुर्गा भाटी, सुनंदा खरात, छाया देवराज,वंदना कुलकर्णी,राजश्री पगार,रुपाली मुंदडा,सारिका शर्मा,मनीषा ठाकरे,सीमा गवळी,सविता डोंगरे, मनीषा पाटील , विजया पवार,रंजना कोलते, सुष्मा वाघ, युवासेना सहसचिव धर्मराज दानवे, विठ्ठल डमाळे,अक्षय साठे,रामेश्वर कोरडे, मधुर चव्हाण ,अतुल बिडकर, यश पागोरे,श्रीकृष्ण पांचाळ,संभाजी सोनवणे,साईनाथ थोरवे, अविनाश वाघुले ,प्रतीक अंकुश, वरद पठाडे ,चरण शिंदे,करण शिंदे, आस्तिक देवतवाल व देवीदास खरात उपस्थित होते.

# अजिंठा येथे बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेळ्या व एक बोकड ठार !

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी



**अजिंठा :** येथे बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेळ्या व एक बोकड ठार माराल्याची घटना शनिवारी दि. ६ सकाळी उघडकीस आले. परिसरात बिबट्याचा वावर वाढू लागल्याने शेतकऱ्यांसह ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

मिळालेल्या माहितीनुसार सिल्लोड तालुक्यातील अजिंठा येथील अंधारी शिवारातील शेतकरी गजानन अगवाला यांचा शेतातील गट क्र १५ मधील गोठ्यात बांधलेल्या शुक्रवारी (दि. ५) रात्री १२ वाजेच्या सुमारास बिबट्याने शेळ्यावर हल्ला करून दोन शेळ्या व एक बोकुड ठार केले .या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे शिवणा वनपाल दिपक सोनार, वनरक्षक वैद्य, वन कर्मचारी मुकेश गुप्ता यांनी घटनास्थळी भेट देऊन मृत शेळ्यांचा पंचनामा केला. तर पशुवैद्यकीय अधिकारी चंद्रकात म्हात्रे यांनी शविच्छेदन केले .या घटनेमध्ये गजानन अगवाल यांचे ५० हजार रुपयांचे अर्थिक नुकसान झाले असून बिबट्याचे बंदोबस करण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे .

# अपघातविरहित सेवेसाठी चालक इरफान तडवी यांचा सन्मान



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव, दि.७ जून :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने सोयगाव आगारातील चालक इरफान इस्माईल तडवी बिल्ला क्र.१९७०० यांचा अपघातविरहित सेवेसाठी सन्मान करण्यात आला. तब्बल २६ वर्षांहून अधिक काळ सुरक्षित व शिस्तबद्ध सेवा बजावत प्रवाशांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण केल्याबद्दल त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत सोयगाव आगारात कार्यरत असलेल्या तडवी यांनी आपल्या सेवाकाळात उत्कृष्ट कर्तव्यदक्षता,वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आणि सुरक्षित वाहनचालनाचा आदर्श ठेवला आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने त्यांना सन्मानपत्र व २५००० रु चा चेक देऊन गौरविले.या सन्मानामुळे सोयगाव आगारातील अधिकारी,कर्मचारी तसेच प्रवासी वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या 'अराजकतावादी' टीकेवर अभिजीत दिपकेंचा छत्रपती संभाजीनगरमधून एल्गार; म्हणाले, "हा महाराष्ट्र आहे, उत्तर प्रदेश नाही!"

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर:** सध्या देशात आणि राज्यात पेपर लीक, परीक्षांमधील सावळागोंधळ आणि बेरोजगारीच्या मुद्द्यावरून तरुण वर्ग रस्त्यावर उतरलेला असतानाच, आता यावरून राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक आणि तरुण नेते अभिजीत दिपके यांनी मुख्यमंत्र्यांच्या 'अराजकतावादी चेहरा आणि मनसुबे उघड झाले' या विधानाचा छत्रपती संभाजीनगरमधील पत्रकार परिषदेत अत्यंत तीव्र शब्दांत समाचार घेतला. "आम्ही 'जय भीम'च्या घोषणा देतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडतो आणि विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी लढतो, मग संविधानाचा मार्ग स्वीकारणे ही अराजकता कशी काय असू शकते?" असा थेट सवाल दिपके यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्र्यांनी दिल्लीतील आंदोलनाचा संबंध अराजकतेशी जोडल्यानंतर, दिपके यांनी त्यांच्यावर थेट वैचारिक हल्ला चढवला आहे. हा वाद केवळ एका विधानापुरता मर्यादित नसून, याला गेल्या काही महिन्यांपासून देशात




सुरू असलेल्या शैक्षणिक गोंधळाची पार्श्वभूमी आहे. दिल्लीतील जंतर-मंतरवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात तरुण आणि विद्यार्थी संघटनांनी जे मोठे आंदोलन उभारले, त्याचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये दिपके यांचाही सहभाग होता. याच आंदोलनावरून मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना 'अराजकतावादी' ठरवण्याचा प्रयत्न केला होता. त्याला उत्तर देताना दिपके यांनी महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेची आठवण करून दिली. "मुख्यमंत्र्यांनी हे विसरू नये की ते उत्तर प्रदेशचे नाही, तर शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. इथे संविधानाचे पुस्तक हातात घेऊन चालणाऱ्यांना देशद्रोही किंवा अराजक ठरवण्याची हुकूमशाही खपवून घेतली जाणार नाही," असा इशारा त्यांनी दिला.

या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दिपके यांनी थेट तरुणांच्या आणि विद्यार्थ्यांच्या मुख्य प्रश्नांना हात घालत सरकारची कोंडी केली. देशात पदव्या असूनही तरुण बेरोजगार आहेत, स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटत आहेत आणि यावर जाब विचारला की सरकार दडपशाही करत आहे, असा आरोप त्यांनी केला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिलाच पाहिजे, या मागणीवर ते ठाम राहिले. "देशातील तरुण आता सरकारच्या धमक्यांना किंवा गुन्ह्यांना घाबरत नाही. जोपर्यंत शिक्षण व्यवस्थेतील हा भ्रष्टाचार साफ होत नाही आणि तरुणांना रोजगार मिळत नाही, तोपर्यंत जंतर-मंतरवरून पेटलेली ही ठिणगी आता देशभरात पसरेल," असा आक्रमक निर्धार व्यक्त करत दिपके यांनी मुख्यमंत्र्यांचे आव्हान स्वीकारल्याचे दाखवून दिले आहे. या थेट संघर्षामुळे येणाऱ्या काळात सरकार आणि तरुण संघटनांमधील वाद अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# सोयगाव शिवारात वादळाचा तडाखा;- शेतातील खोल्यांचे पत्रे हवेत




हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.७ जून :** सोयगाव सह शिवारात शनिवारी रात्री सात वाजेच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या शेतातील दोन खोल्या वरील पत्रे हवेत उडून नुकसान झाले आहे. दरम्यान शनिवारी रात्री सात वाजेनंतर वादळी वाऱ्याने तासभर तडाखा दिला यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.सोयगाव शिवारात मयुर सुरेश मनगटे यांच्या गट क्र. १७२ मध्ये असलेल्या दोन खोल्या वरील पत्रे वादळाने उडून खोल्या च्या भिंती ढासळून नुकसान झाले आहे.दरम्यान सोयगाव शिवारात झालेल्या वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे महसूल विभागाने या नुकसानीचे पंचनामे करण्यात यावे व या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

# साई वृंदावन कॉलनीत आरोग्य शिबिर



**छत्रपती संभाजीनगर, :** पैठण रोड भागातील साई वृंदावन कॉलनीतील सांस्कृतिक सभागृहात मणके दुखी व सांधेदुखी विषयक आरोग्य शिबिराचे रविवारी आयोजन करण्यात आले. माजी महापौर नंदकुमार घोडेले व अनिता घोडेले यांच्या पुढाकाराने सदरील शिबिर घेण्यात आले. गुजरात मधील अहिवा डांग जिल्ह्यातील वैद्य गुलाब आहिर यांनी रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केले. जुनाट मणके दुखी व सांधे दुखी आजाराचे निष्णात तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जातात.

शिबिराचा दिवसभरात १६० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी अरविंद पटेल, विश्वनाथराव तुपे पाटील, डॉ. संजय कवडे, सुभाष वैद्य, वसंतराव वाघ, एन टी डोंगरे, राजेंद्र कवडे, गटविकास अधिकारी शिरसाळकर, काशिनाथ दापके, प्रा सचिन नवथर, चेतन डोंगरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# नि:स्वार्थ समाजसेवकच समाजाला संवेदनशीलता आणि दिशा देतात : रत्नाकर पाटील

## भाऊराव गायकवाड यांना 'डॉ. स्नेहा वेलिंग आदर्श स्वयंसेवी कार्यकर्ता पुरस्कार' प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समाजात विविध प्रकारच्या घटना घडत असल्या तरी समाजव्यवस्था आजही सक्षमपणे उभी आहे, ती कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी कार्य करणाऱ्या निःस्वार्थ समाजसेवकांमुळेच. अशा व्यक्तींच्या कार्यातून समाजात संवेदनशीलता, माणुसकी आणि सामाजिक जबाबदारीची भावना जिवंत राहते, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे भाऊराव रायभान गायकवाड यांना 'डॉ. स्नेहा वेलिंग आदर्श स्वयंसेवी कार्यकर्ता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. ओंकार शैक्षणिक संकुल येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

रत्नाकर पाटील म्हणाले की, समाजहितासाठी सातत्याने काम करणाऱ्या व्यक्ती हे समाजाचे



खरे आधारस्तंभ असतात. त्यांचे कार्य अनेकांना प्रेरणा देणारे असून समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी अशा कार्यकर्त्यांचे योगदान अनमोल आहे.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मनोज पल्लोड यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना समाजसेवेसाठी समर्पित व्यक्तींना सन्मानित करण्याचा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. अशा पुरस्कारांमुळे सामाजिक कार्य करणाऱ्यांना नवी ऊर्जा मिळते आणि समाजहिताची भावना अधिक बळकट होते, असे त्यांनी नमूद केले.

पुरस्कार स्वीकारताना भाऊराव रायभान गायकवाड यांनी हा सन्मान समाजाच्या विश्वासाचा आणि सहकाऱ्यांच्या सहकार्याचा असल्याची भावना व्यक्त केली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील काळातही अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त राजू वाकोडे, विश्वस्त अधुरीताई गावित यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्रकांत पाटील, विजय उक्कलगावकर, डॉ. संदीप डफळे, वंदना सुरडकर, सतीश डिवरे, पंकज आडे, अविनाश ताबेकर, किशोर कांबळे, रतन अंभोरे, माधुरी गावित, देवहुती न्यायाधीश, रेणुका देशपांडे, राहुल काकडे, रतन पवार, ज्ञानेश्वर लेवडे, प्रशांत सोमवंशी, माधवी देशमुख, विजय गव्हाणे, साक्षी तुपे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

ही बातमी सामाजिक कार्याचे महत्त्व, स्वयंसेवकांची भूमिका आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणाऱ्या शैलीत मांडलेली आहे.

# संडे ऑन सायकल उपक्रमास 200 नागरिकांकडून प्रतिसाद ; पोलीस आयुक्तालय, साई केंद्राचा उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता, शहर प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर:** पोलीस आयुक्तालय, भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई), राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र एनसीओई), , सीआयएसएफ , ईएसआयसी ,छत्रपती संभाजीनगर सायकलिंग असोसिएशन, सायकलिस्ट फाउंडेशन तसेच इतर सहकारी संस्थांच्या सहकार्याने आयोजित "फिट इंडिया संडेज ऑन सायकल" या उपक्रमाचे रविवारी सकाळी आयोजन करण्यात आले आहे.या यावेळी पोलीस उपायुक्त मुख्यालय शर्मिष्ठा घारगे (वालावलकर) साईच्या पश्चिम विभागीय केंद्राच्या संचालिका डॉ.मोनिका घुगे (सानप) सहाय्यक पोलीस आयुक्त वसुंधरा बोरगावकर, साईचे उपसंचालक सुमेध तरोडीकर , हिमांशू गोडबोले, अजिंक्य ,सीआयएसएफ चे अजय कुमार ,एमजीएम विद्यापीठ क्रीडासंचालक नितीन घोरपडे, आर्यनमॅन दर्शन घोरपडे आदी उपस्थित

होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसिफ शेख यांनी केले.सुरुवातीला झुम्बा व व्यायाम घेण्यात आला.

**सकाळी** 6:15 वाजता पोलीस आयुक्त कार्यालय , पोलीस ग्राऊंड, येथून हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात येणार आहे.ही सायकल रॅली




पानचक्की –लॉ कॉलेज – लिटल फ्लॉवर स्कूल – मिल कॉर्नर मार्गे पुन्हा पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस ग्राउंड येथे समाप्त झाली.

या उपक्रमात साई प्रशिक्षण केंद्र,पोलीस कर्मचारी , सीडीसी ए, सायकलिस्ट फाऊंडेशनचे सदस्य तसेच सामान्य नागरिक मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये नियमित व्यायाम, तंदुरुस्ती आणि सायकलिंगबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच निरोगी व सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा आहे. कार्यक्रमात खेळाडू, फिटनेस प्रेमी, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, सुरक्षा दलाचे जवान, सायकलपटू तसेच नागरिकांनी सायकल चालवून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास भरघोस प्रतिसाद दिला.

सायकल रॅलीनंतर सहभागींसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ, फिटनेस चॅलेंजे व सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात रस्सीखेच लक्ष्यवेधी ठरली.सर्व सहभागींना साई केंद्राच्यावतीने टी-शर्ट व अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.सहभागी सायकलपटूंना ई-प्रमाणपत्र,मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम फिट इंडिया अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आला असून निरोगी, सक्रिय आणि तंदुरुस्त भारत घडविण्याच्या उद्दिष्टाला बळकटी देणारा आहे. साई केंद्राकडून पोलीस कर्मचारी, खेळाडूंसाठी सायकलची व्यवस्था करण्यात आली होती.

**लहानांपासून ज्येष्ठांचा सहभाग :** या उपक्रमात सीएसएन डीसीए संघटनेचे अध्यक्ष निखिल कचेश्वर,सचिव चरणजितसिंग संघा, डॉ. विजय व्यवहारे,सहसचिव अतुल जोशी, राजकुमार मालानी, मोहन उन्हाळे,स्नेहल जाजू,ऋषिकेश मिसाळ,जयंत सांगवीकर,प्रफुल्ल मोहरील,सतीश पुरुषोत्तम अन्वेकर ,संतोष हिरेमठ, मनप्रीतकौर कौर संघा, सचिन जोशी ,संतोष वाघ,संतोष बेडके,शुद्धी जाजू, आदी 200 नागरिक सहभागी झाले होते.

**सायकलिंग फिटनेसचा आधार :** "फिटनेसका डोस आधा घंटारोज" असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत छत्रपती संभाजीनगर येथील नागरिक व पोलीस कर्मचारी,खेळाडू या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.तंदुरुस्त भारत ही चळवळ अधिक व्यापक होत असून हे मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ.मोनिका घुगे यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911